आजचे पंचांग

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, अमावास्या संध्याकाळी ५-२२ पर्यंत नंतर प्रतिपदा तिथी, दिवस नक्षत्र- रेवती दुपारी १२-०२ पर्यंत चंद्र रास- मीन दुपारी १२-०२ पर्यंत नंतर मेष, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## १५ टक्के पाणीकपात?

**पुणे**: हवामान विभागाने यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवली आहे. त्याशिवाय खडकवासला प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत पुरविण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून जलसंपदा विभागाने पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेसह एमआयडीसीला दरमहा १५ टक्के पाणी कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे पुणेकरांना आता उन्हाळ्याच्या तीव्र झळांसोबतच पाणीटंचाईचाही सामना करावा लागण्याची शक्यता आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १७ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### सिलिंडरचा अवैध साठा जप्त

**ठाणे** : ठाणे शहरातील एका मॉलच्या आवारातील गोदामात बेकायदेशीरपणे साठवलेले १३० हून अधिक भरलेले आणि रिकामे एलपीजी सिलिंडर पोलिसांनी जप्त केले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पोलिसांनी त्या जागेवर छापा टाकून एकूण १३८ गॅस सिलिंडर जप्त केले, त्यापैकी ८५ रिकामे होते. विविध गॅस कंपन्यांच्या या सिलिंडर्सचे एकत्रित मूल्य सुमारे ४.४८ लाख रुपये आहे.

### सूरजपूरमध्ये जंगली हत्तीने चिरडले

**सूरजपूर (छत्तीसगड) :** छत्तीसगडच्या सूरजपूर जिल्ह्यातील त्याच्या गावाजवळील जंगलात एका जंगली हत्तीने चिरडून एका २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. बुधवारी रात्री उशिरा सूरजपूर वनक्षेत्रातील कोटबहरा गावाजवळ केशव नावाचा पीडित व्यक्ती कामावरून घरी परतत असताना त्याचा हत्तीशी सामना झाला, असे एका वन अधिकाऱ्याने सांगितले. याची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी हलवण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

### बीडमध्ये प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ जप्त

**बीड :** बीडमधील एका दुकानातून गुरुवारी २.४५ लाख रुपयांचे प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले, अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने दिली. मिळालेल्या माहितीच्या आधारे राजुरी नवगण येथील दुकानावर छापा टाकण्यात आला. एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. सुगंधी तंबाखू आणि गुटखा जप्त केला आहे. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे त्याने सांगितले.

### महायुती आघाडीवर, मविआसमोर गणिती कसोटी

# विधानपरिषद 9 जागांसाठी 12 मे रोजी मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर विरोधकांसमोर आणखी एक आव्हान उभे ठाकले असून, विधानपरिषदेच्या ९ रिक्त जागांच्या निवडणुकीतही त्यांची पीछेहाट होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १२ मे रोजी मतदान होणार असून, सध्याच्या राजकीय संख्याबळाच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीचे वर्चस्व राहणार असल्याचे चित्र आहे.

राज्यातील विधानसभेतील आकडेवारी पाहता महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार गट मिळून मोठे संख्याबळ उभे करत असल्याने ९ पैकी किमान ७ जागांवर त्यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे. राहुरी आणि बारामती येथील पोटनिवडणुकांनंतर या आघाडीची ताकद आणखी वाढण्याची शक्यता असल्याने त्यांचा पलडा अधिक जड ठरत आहे.

महाविकास आघाडीसमोर मात्र गणिती कसोटी उभी राहिली आहे. महाविकास आघाडी कडे सध्या एकूण ४६ आमदारांचे संख्याबळ आहे. त्यामुळे एक जागा जिंकणे त्यांच्यासाठी सहज शक्य असले, तरी दुसऱ्या जागेसाठी आवश्यक मतांची कमतरता भासणार आहे. दुसऱ्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी किमान १० अतिरिक्त मतांची गरज भासणार असल्याने आघाडीत तडजोडीचे राजकारण रंगण्याची शक्यता आहे.

राज्यसभेच्या निवडणुकीत झालेल्या समन्वयानुसार यावेळी शरद पवार गट माघार घेण्याची शक्यता वर्तवली जात असून, उपलब्ध एकमेव जागा उबाठाच्या वाट्याला जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

महायुती कडे भाजपचे १३२, शिवसेनेचे ५७ आणि अजित पवार गटाचे ४१ असे भक्कम संख्याबळ आहे. त्यामुळे विधानपरिषदेच्या निवडणुकीत त्यांची रणनीती स्पष्ट असून, बहुसंख्य जागांवर विजय मिळवण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. केशव उपाध्ये, माधवी नाईक, रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि राम सातपुते यांची नावे चर्चेत असून, अनेक माजी आमदार आणि पदाधिकारीही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

भाजपचे रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय केनेकर, संदीप जोशी, दादाराव केचे यांच्यासह शिवसेनेच्या नीलम गोऱ्हे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, काँग्रेसचे राजेश राठोड आणि उद्धव ठाकरे गटाचे सदस्य निवृत्त होत आहेत.

# अमीर हमजावर अज्ञातांचा गोळीबार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लाहोर** : पाकिस्तानातील पंजाब प्रांताची राजधानी असलेल्या लाहोर येथे गुरुवारी एक धक्कादायक घटना घडली. दहशतवादी संघटना लश्कर-ए-तोयबाचा संस्थापक सदस्य मानला जाणारा अमीर हमजा याच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. एका वृत्तवाहिनीच्या कार्यालयाबाहेर ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या हमजाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सूत्रांनी सांगितले. हल्लेखोरांची ओळख अद्याप पटलेली नसून, पोलिसांकडून तपास सुरू आहे. अमीर हमजा हा कुख्यात दहशतवादी हाफिज सईद याचा निकटवर्तीय मानला जातो. संघटनेच्या विस्तारात त्याची महत्त्वाची भूमिका असून, 'लश्कर-ए-तोयबा'चा 'राजकीय मेंदू' म्हणूनही त्याची ओळख आहे. संघटनेच्या स्थापनेत सहभागी असलेल्या प्रमुख सदस्यांपैकी तो एक असल्याचे मानले जाते.

तरुणांचे ब्रेनवॉश करून त्यांना दहशतवादी कारवायांकडे वळवणे, निधी उभारणी करणे, तसेच अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांच्या सुटकेसाठी दबाव तंत्र वापरणे, अशा विविध कारवायांमध्ये त्याचा सहभाग असल्याचे सांगितले जाते. अमेरिकानेही त्याला दहशतवादी म्हणून घोषित केले आहे. या घटनेमुळे लाहोरमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

# २०२९ पर्यंत निवडणुका जुन्याच मतदारसंघांप्रमाणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : २०२९ पर्यंत होणाऱ्या सर्व निवडणुका सध्याच्या मतदारसंघांच्या रचनेनुसारच पार पडतील, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत स्पष्ट केले. परिसीमन आयोगाचा अहवाल संसदेकडून मंजूर होऊन राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतरच लागू होईल, आणि ही प्रक्रिया २०२९ पूर्वी पूर्ण होण्याची शक्यता नाही, असे त्यांनी सांगितले.

संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ यावर चर्चा करताना अमित शाह यांनी सरकारची भूमिका मांडली. या विधेयकांमुळे दक्षिण भारतातील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होईल, असे जे चुकीचे कथानक विरोधकांकडून केले जात आहे, ते चुकीचे असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

परिसीमनाचा अहवाल लागू होण्यासाठी संसदेकडून मंजुरी आणि राष्ट्रपतींची संमती आवश्यक असते. त्यामुळे २०२९ पर्यंत निवडणूक व्यवस्था जशी आहे तशीच राहील, असे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले.

लोकशाहीबाबत बोलताना शाह म्हणाले की, देशातील सत्ता ही नागरिकांच्या मतांमधूनच येते. लोकशाही संपवण्याची कोणाचीही ताकद नाही. आणीबाणीच्या काळात असा प्रयत्न झाला, मात्र जनतेनेच तो पराभूत केला. जनतेला पुरेसे प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी हे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

### सुदैवाने जिवितहानी नाही; स्पाईसजेट आणि अकासा एकरची विमाने

# दिल्ली विमानतळावर दोन विमानांची धडक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी सकाळी दोन प्रवासी विमानांमध्ये धडक झाल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र दोन्ही विमानांचे नुकसान झाले असून उड्डाणांवर परिणाम झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टॅक्सींग प्रक्रियेदरम्यान स्पाईसजेटच्या बोईंग ७३७-७०० विमानाची अकासा एअरच्या विमानाशी धडक झाली. या अपघातात स्पाईसजेटच्या विमानाच्या उजव्या विंगलेटचे नुकसान झाले, तर अकासा एअरच्या विमानाच्या डाव्या बाजूच्या हॉरिझॉन्टल स्टॅबिलायझरला धक्का बसला.

घटनेनंतर तत्काळ सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे विमानातून खाली उतरवण्यात आले. विमानतळ प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून दोन्ही विमानांची उड्डाणे तातडीने थांबवली. संबंधित प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली असून त्यांना त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अकासा एअरचे दिल्ली-हैदराबाद क्यूपी-१४०६ हे विमान बे एरियामध्ये उभे असताना ही घटना घडल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे, स्पाईसजेटचे विमान टॅक्सींग करत असताना ही धडक झाल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेची माहिती नागरी उड्डाण प्राधिकरणासह संबंधित यंत्रणांना देण्यात आली असून सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. अपघाताचे नेमके कारण, टॅक्सींग प्रक्रियेतील त्रुटी किंवा मानवी चूक यांचा तपास केला जात आहे. दोन्ही विमानांची तांत्रिक तपासणी करण्यासाठी तज्ज्ञांची टीम नियुक्त करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात कोलकाता विमानतळावरही अशाच प्रकारची घटना घडली होती. त्यामुळे विमानतळावरील ग्राउंड ऑपरेशन्स आणि सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या घटनेत जीवितहानी टळली असली तरी, विमानतळावरील सुरक्षा प्रक्रियेची काटेकोर अंमलबजावणी आणि समन्वयाची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

# चेक क्लिअरन्समध्ये विलंब ही 'सेवेतील त्रुटी'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** बँकेने कोणत्याही योग्य कारणाशिवाय ग्राहकाचा चेक वेळेत क्लिअरन्ससाठी सादर केला नाही, तर तो सेवेतील दोष मानला जाईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने हा निकाल देत कॅनरा बँकेवर ठोठावलेला दंड कायम ठेवला.

संबंधित ग्राहकाने २९ मे २०१८ रोजी एकूण १ कोटी ६ लाख १० हजार ७६८ रुपयांचे दोन धनादेश बँकेत जमा केले होते. या चेकची वैधता २ जून २०१८ पर्यंत होती. सुरुवातीला तांत्रिक कारण देत बँकेने हे चेक परत केल्याचे सांगितले; मात्र त्यानंतर ते तातडीने पुन्हा सादर करण्यात बँकेने विलंब केला. परिणामी, मुदत संपल्यानंतर सादर केलेले चेक 'कालबाह्य' ठरले आणि नाकारण्यात आले.

बँकेने ३० आणि ३१ मे रोजी झालेल्या संपामुळे विलंब झाल्याचा युक्तिवाद मांडला. मात्र, न्यायालयाने हा दावा अमान्य केला. संपानंतर १ आणि २ जून हे कामकाजाचे दिवस उपलब्ध असताना चेक का सादर करण्यात आले नाहीत, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. संप संपल्यानंतर वाजवी वेळेत कारवाई करणे बँकेचे कर्तव्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले. खंडपीठाने स्पष्ट केले की, चेक वसुलीसाठी स्वीकारल्यानंतर बँक ही ग्राहकाची प्रतिनिधी म्हणून काम करत असते. त्यामुळे चेकची मुदत संपण्यापूर्वी तो सादर करणे ही बँकेची जबाबदारी आहे. या कर्तव्यातील निष्काळजीपणा म्हणजेच सेवेतील त्रुटी ठरते.

राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाने यापूर्वी बँकेला चेकच्या रकमेच्या १० टक्के भरपाई देण्याचे आदेश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने बँकेचा दोष कायम ठेवला, मात्र भरपाईची रक्कम जास्त असल्याचे नमूद करत ती १० टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत कमी केली. नुकसानीचे अचूक स्वरूप स्पष्ट नसल्यामुळे भरपाईत कपात करण्यात आल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे बँकिंग क्षेत्रात ग्राहकांच्या हक्कांना बळकटी मिळणार असून, चेक क्लिअरन्स प्रक्रियेत निष्काळजीपणा केल्यास बँकांना जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट संदेश न्यायालयाने दिला आहे.

### इराणचे तेल भारताने नाकारले?

**नवी दिल्ली** : इराण-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर जगभरातील तेलपुरवठा खंडित झाला आहे. अशा परिस्थितीत, इराणमधून सुमारे २० लाख बॅरल कच्चे तेल घेऊन आलेला एक टँकर गुजरात किना-यावर पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या बाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने भारतीय तेल कंपन्यांनी हे इराणी तेल स्वीकारण्यास नकार दिला आहे. एक क्रूड कॅरियर मंगळवारी गुजरातमधील बंदरावर दाखल झाला. या टँकरमध्ये २८ मार्च रोजी इराणी कच्चे तेल भरले गेले होते. मात्र, ही तारीख अमेरिकेने दिलेल्या निर्बंध सवलतीच्या कालावधीबाहेरची असल्याने हा माल वादग्रस्त ठरत आहे.

# इराणने शांतता करार मोडला तर युद्ध

### अमेरिकेच्या पेंटागॉनचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** इराणने शांतता करार मान्य केला नाही, तर पुन्हा एकदा युद्ध सुरू होऊ शकते. इराणकडे तडजोड करण्याची संधी आहे, परंतु जर त्यांनी ती फेटाळली तर अमेरिका पुन्हा लष्करी कारवाई सुरू करेल. अमेरिकन फौजा पूर्णपणे तयार असून कोणत्याही क्षणी 'कॉम्बॅट ऑपरेशन' (लष्करी मोहीम) सुरू करू शकतात. अमेरिकन सैन्य राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाची वाट पाहत असून, निर्देश मिळताच कारवाई सुरू केली जाईल, असा इशारा अमेरिकेच्या पेंटागॉनचे प्रमुख पीट हेगसेथ यांनी दिला आहे.

हेगसेथ यांनी म्हटले आहे की, अमेरिका इराणवरील नौदल नाकेबंदी सुरूच ठेवेल. अमेरिका आपले धोरणात्मक उद्दिष्ट साध्य करत नाही, तोपर्यंत ही कारवाई सुरू राहील असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अमेरिकन जनरल डॅन केन यांनी सांगितले की, आतापर्यंत नाकेबंदीमुळे १३ जहाजे परतली आहेत. यापैकी बहुतांश जहाजे नाकेबंदीच्या सीमेच्या आत पोहोचल्यानंतर परतली, तर एका जहाजाने आधीच आपला मार्ग बदलला. २१ एप्रिल रोजी संपणाऱ्या शस्त्रसंधीपूर्वी (Ceasefire) अमेरिका आणि इराण कराराच्या जवळ पोहोचत आहेत. अमेरिकन मीडियानुसार, दोन्ही बाजूंमधील चर्चेत प्रगती झाली आहे, तरीही काही मुद्द्यांवर अद्याप मतभेद कायम आहेत. दरम्यान, तेहरानमध्ये इराणी अधिकारी आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांच्यात महत्त्वाची बैठक होणार आहे.

मुनीर यांनी इराणमध्ये पोहोचून परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांची भेट घेतली असून, ते अमेरिकेचा संदेश घेऊन गेल्याचे समजते. पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्की हे देश मध्यस्थाची भूमिका बजावत आहेत.

### मोटार वाहन नियमांमध्ये दुरुस्ती; एका वर्षात ५ उल्लंघनांनंतर कठोर शिक्षा

# वारंवार वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारने कडक पावले उचलली आहेत. मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत केंद्रीय मोटार वाहन नियमावलीत तिसरी दुरुस्ती करून केंद्रीय मोटार वाहन (तिसरी दुरुस्ती) नियम २०२६ लागू करण्यात आले आहेत. हे नियम २० जानेवारी २०२६ पासून अंमलात आले असून, नियमभंग करणाऱ्यांसाठी आता अधिक कडक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

नवीन नियमांनुसार, एका वर्षात पाच किंवा त्यापेक्षा अधिक वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर 'गंभीर अपराधी' म्हणून कारवाई केली जाणार आहे. मात्र, एका वर्षातील उल्लंघनांची गणना पुढील वर्षात केली जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. यामुळे नियमितपणे नियम तोडणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करण्याचा सरकारचा प्रयत्न दिसून येतो.

ई-चलान प्रणाली अधिक पारदर्शक आणि सक्षम करण्यावरही भर देण्यात आला आहे. पोलीस अधिकारी किंवा राज्य सरकारने अधिकृत केलेले अधिकारी प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चलान जारी करू शकतील. तसेच, सीसीटीव्ही आणि इतर इलेक्ट्रॉनिक निरीक्षण यंत्रणेद्वारे स्वयंचलित चलान प्रणालीही प्रभावीपणे राबवली जाणार आहे. प्रत्यक्ष चलान १५ दिवसांच्या आत, तर ई-चलान तीन दिवसांच्या आत संबंधित वाहनचालकांपर्यंत पोहोचवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

चलान मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तीस ४५ दिवसांच्या आत दंड भरावा किंवा योग्य कागदपत्रांसह त्याला आव्हान द्यावे लागणार आहे. जर या कालावधीत कोणतीही कारवाई केली नाही, तर पुढील ३० दिवसांत पूर्ण दंड भरणे किंवा ५० टक्के रक्कम भरून न्यायालयात दाद मागण्याची संधी दिली जाईल. त्यानंतरही दंड न भरल्यास चलान स्वीकारलेले मानले जाईल आणि पुढील १५ दिवसांत पूर्ण रक्कम भरणे अनिवार्य असेल. याशिवाय, चलान स्वीकारल्यानंतरही दंड न भरल्यास संबंधित वाहनचालकाला दररोज इलेक्ट्रॉनिक सूचना पाठवण्यात येतील. दंड थकवल्यास वाहनचालकाच्या ड्रायव्हिंग लायसन्स किंवा वाहन नोंदणीशी संबंधित कोणतीही प्रक्रिया पुढे नेली जाणार नाही.

अशा प्रकरणांमध्ये संबंधित वाहन किंवा परवाना 'नॉट टू बी ट्रान्झॅक्टेड' म्हणून चिन्हांकित केला जाईल. गंभीर उल्लंघनांच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार वाहन जप्त करण्याचा अधिकारही अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. नव्या नियमांमुळे वाहतूक शिस्त राखण्यासाठी कडक यंत्रणा उभारण्याचा सरकारचा स्पष्ट प्रयत्न दिसून येत आहे.

# 'महात्मा फुले कौशल्य केंद्रे'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील युवक-युवतींना कौशल्याधारित शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. मंगल प्रभात लोढा यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र' या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यभरात १०० केंद्रे सुरू करण्यात येणार असून, पुढील काळात ही संख्या १००० पर्यंत वाढविण्याचा सरकारचा मानस आहे.

मुंबई महानगरपालिकेत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना लोढा यांनी या योजनेची सविस्तर माहिती दिली. या बैठकीदरम्यान अश्विनी भिडे यांची भेट घेऊन मुंबईत या केंद्रांच्या अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली. मुंबई शहर व उपनगरांमध्येही ही योजना राबविण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याची विनंती महापालिका प्रशासनाला करण्यात आली आहे.

लोढा यांनी स्पष्ट केले की, नव्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणासोबत कौशल्याची जोड देणे अत्यावश्यक ठरले आहे. या केंद्रांमधून शहरी भागातील गरजांनुसार विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. विशेषतः झोपडपट्टी परिसरातील तरुणांपर्यंत ही संधी पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. "केवळ पदवी नव्हे, तर त्यासोबत कौशल्यही आत्मसात केल्यास रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतात," असे त्यांनी नमूद केले.

## संपादकीय

### हट्टापायी अधोगती



**अमेरिका आणि इराण यांच्यातील दशकानुदशकांचा संघर्ष आता अशा वळणावर आला आहे, जिथे दोन्ही देशांच्या 'सर्वोच्च' अटी जागतिक शांततेच्या आड येत आहेत. परस्परविरोधी टोकाच्या भूमिका सोडून व्यावहारिक तडजोड केली नाही, तर या भूराजकीय संघर्षाचा अंत विनाशकारीच असेल.**

जागतिक राजकारणाच्या सारीपाटावर काही प्रश्न हे सुटण्यासाठी नसून केवळ चिघळत ठेवण्यासाठीच असतात की काय, असा प्रश्न पडावा अशी स्थिती सध्या अमेरिका आणि इराण यांच्यातील संबंधांबाबत निर्माण झाली आहे. 'आम्ही म्हणू तीच पूर्व दिशा' हा महासत्तेचा अहंकार आणि 'आमच्या अटी मान्य केल्याशिवाय तसूभरही मागे हटणार नाही' हा इराणचा ताठरपणा, या दोन टोकांच्या भूमिकांमुळे मध्यपूर्वेतील शांतता केवळ करारातच नव्हे, तर हवेतही विरून जाताना दिसत आहे. 'इंडियन एक्सप्रेस'ने अलीकडेच अधोरेखित केल्याप्रमाणे, या दोन्ही देशांनी आता आपापल्या 'मॅक्सिमलिस्ट' मागण्यांना तिलांजली देण्याची वेळ आली आहे. अन्यथा, या संघर्षाचा धूर केवळ तेहरान किंवा वॉशिंग्टनपुरता मर्यादित न राहता संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला गुदमरवून टाकेल. इतिहासाच्या पाऊलखुणा पाहिल्या तर १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर अमेरिका आणि इराण यांच्यात विश्वासाचा जो अभाव निर्माण झाला, तो आजवर कोणाही राज्यकर्त्याला भरून काढता आलेला नाही. बराक ओबामा यांच्या काळात २०१५ मध्ये झालेला अणुकरार हा या अंधाऱ्या दरीत दिसलेला एक आशेचा किरण होता. पण, ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट'च्या आक्रमकतेने आणि करारातून बाहेर पडण्याच्या एकतर्फी निर्णयाने त्या किरणाचे रूपांतर पुन्हा एकदा काळोखात केले. तेव्हापासून सुरू झालेला हा 'तू तू-मैं मैं'चा खेळ आता अशा टप्प्यावर पोहोचला आहे की, तिथे मुत्सद्देगिरीपेक्षा लष्करी सामर्थ्य आणि आर्थिक निर्बंधांची भाषा अधिक बोलकी ठरत आहे. सध्याच्या पेचप्रसंगाचे मुख्य कारण म्हणजे दोन्ही बाजूंचा कमालीचा अट्टाहास. अमेरिकेला वाटते की, इराणने केवळ आपला अण्वस्त्र कार्यक्रमच बंद करू नये, तर आपले क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नष्ट करावे आणि मध्यपूर्वेतील आपल्या हस्तकांचे ( प्रॉक्सी) समर्थन पूर्णपणे थांबवावे. दुसरीकडे, इराणची मागणी अशी आहे की, अमेरिकेने आधी सर्व आर्थिक निर्बंध उठवावेत, पुन्हा कधीही करारातून बाहेर पडणार नाही याची खात्री द्यावी आणि त्यानंतरच वाटाघाटीचे मेज सजवावे. हे दोन्ही दावे आपापल्या जागी तर्कशुद्ध वाटत असले तरी, भूराजकीय वास्तवाच्या कसोटीवर ते पूर्णपणे 'अव्यावहारिक' आहेत. इराणमधील अंतर्गत परिस्थितीचा विचार केला तर, तिथल्या धार्मिक नेतृत्वासाठी (सुप्रीम लीडर) झुकणे म्हणजे आपल्या अस्तित्वालाच आव्हान देणे होय. ढासळती अर्थव्यवस्था, जनतेचा असंतोष आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव यांमुळे इराणचे शासन आधीच दबावाखाली आहे. अशा वेळी अमेरिकेसमोर लोटांगण घालणे हे त्यांच्यासाठी आत्मघातकी ठरू शकते. इराणने आपले अण्वस्त्र स्वप्न बाजूला ठेवले, तरच जागतिक बाजारपेठेत त्यांचे तेल पुन्हा एकदा वाहू लागेल आणि त्यांच्या अर्थव्यवस्थेला उभारी मिळेल, हे साधे अर्थशास्त्र विसरून ते केवळ लष्करी ताकदीच्या जोरावर तग धरू पाहत आहेत. अमेरिकेची अवस्था 'वाघावर बसलेल्या' माणसासारखी झाली आहे. निर्बंधांच्या जोरावर इराणला गुडघ्यावर आणता येईल, हा वॉशिंग्टनचा अंदाज साफ चुकला आहे. उलट, निर्बंधांमुळे इराण अधिक आक्रमक झाला असून त्याने चीन आणि रशियासारख्या अमेरिकेच्या प्रतिस्पर्ध्यांशी हातमिळवणी सुरू केली आहे. जगाला आज एका स्थिर मध्यपूर्वेची गरज आहे. युक्रेन-रशिया युद्ध आणि इस्रायल-हमास संघर्षामुळे जागतिक ऊर्जा सुरक्षा आधीच धोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढणे म्हणजे आगीत तेल ओतण्यासारखे आहे. इराणने हे मान्य करायला हवे की, अण्वस्त्रांच्या शर्यतीत ते कधीही महासत्तांशी स्पर्धा करू शकणार नाहीत. अमेरिकेने हे ओळखायला हवे की, इराणमधील सध्याच्या राजवटीशी 'सन्मानजनक तडजोड' करणे अधिक हिताचे आहे. यालाच 'डिप्लोमसी' किंवा मुत्सद्देगिरी म्हणतात. अमेरिकेने इराणवरील निर्बंधांमध्ये टप्प्याटप्प्याने शिथिलता आणणे आणि बदल्यात इराणने आपल्या अणू संवर्धनाचा वेग मर्यादित करणे, हाच यावरचा मध्यममार्ग आहे. या संघर्षात भरडला जातोय तो जागतिक ग्राहक आणि शांततेची अपेक्षा करणारा सर्वसामान्य माणूस. या संघर्षाचे रूपांतर व्यापक युद्धात होण्यापूर्वीच, दोन्ही देशांच्या नेतृत्वाने आपापल्या अवास्तव मागण्यांना लगाम घालावा. दोन्ही बाजूंनी 'देण्या-घेण्याची' वृत्ती दाखवली जात नाही, तोपर्यंत हा तिढा सुटणार नाही आणि मध्यपूर्वेतील धुमसती आग विझणार नाही. शहाणपण हे वर्तनातही दिसावे लागते; सध्या अमेरिका आणि इराण या दोघांकडेही त्याचीच वानवा आहे.

# पाटण्याचे मळभ आणि दिल्लीकरांची स्वप्ने



**» बिहारच्या मातीत कमळ फुलवण्याचे भाजपचे प्रयत्न निर्णायक वळणावर पोहोचले आहेत. मिळालेले यश महत्त्वपूर्ण असले, तरी बिहारमधील परिस्थिती पाहता सिंहासन पूर्णपणे काबीज झाले आहे, असे म्हणता येत नाही.**

भारतीय राजकारणाच्या सारीपाटावर बिहार हे असे एक राज्य आहे, ज्याने अनेक चाणक्यांना जन्म दिला आणि तितक्याच धुरंधरांना धुळीसही मिळवले. 'न्यू इंडियन एक्सप्रेस'ने नुकत्याच केलेल्या विश्लेषणानुसार, बिहारमधील भाजपचा सध्याचा 'मोमेंट' हा निश्चितच महत्त्वाचा आहे, परंतु तो 'सेटल' किंवा स्थिर आहे असे समजणे ही राजकीय दिवास्वप्ने ठरू शकतात. सत्तेच्या समीकरणात एखादा पक्ष मोठा होणे आणि त्या राज्याच्या सामाजिक तळागाळातील मानसिकतेवर अधिराज्य गाजवणे, यात जे अंतर असते, तेच अंतर सध्या बिहार भाजपला कापायचे आहे. हे अंतर केवळ आकड्यांचे नसून ते 'अस्मितेचे' आणि 'जातीय गणितांचे' आहे.

गेल्या दोन दशकांचा इतिहास पाहिला तर बिहारमध्ये भाजप हा नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) चा धाकटा भाऊ म्हणून वावरला. मोठ्या भावाच्या सावलीत राहून स्वतःची शक्ती वाढवण्याचे तंत्र भाजपने तिथे अत्यंत खुबीने वापरले. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. भाजपने स्वतःला 'मोठा भाऊ' म्हणून प्रस्थापित केले असले, तरी या मोठेपणाला अद्याप लोकमान्यतेची ती मोहोर लागलेली नाही, जी उत्तर प्रदेशात किंवा मध्य प्रदेशात पाहायला मिळते. बिहारमध्ये भाजपला मिळणारे यश हे बऱ्याचदा समोरच्या पक्षातील कमकुवतपणाचे फळ असते, स्वतःच्या अभेद्य तटबंदीचे नाही, हे सत्य नाकारता येणार नाही.

बिहारच्या राजकारणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिथली 'मंडल' विरुद्ध 'कमंडल' ही लढाई. नव्वदच्या दशकात लालूप्रसाद यादव यांनी ज्या सामाजिक न्यायाच्या नावाखाली मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकांचे समीकरण जुळवले, त्याला शह देण्यासाठी भाजपने हिंदुत्वाचा आधार घेतला खरा; पण बिहारमध्ये हिंदुत्वाचा हा मुलामा अद्याप जातीय उतरंडीच्या भिंती पूर्णपणे पाडू शकलेला नाही. आजही तिथे यादव, कुर्मी, कोइरी आणि दलित मतांचे ध्रुवीकरण निवडणुकीचे निकाल ठरवते. भाजपने जरी 'अतिमागास' वर्गाला आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न केले असले, तरी तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दलाने आपला जनाधार ज्या प्रकारे टिकवून ठेवला आहे, तो भाजपसाठी चिंतेचा विषय आहे.

नितीश कुमार यांची राजकीय विश्वासार्हता आता रसातळाला लागली असली, तरी त्यांच्याकडे असलेली 'व्होट बँक' कोणाकडे जाणार, हा कळीचा प्रश्न आहे. नितीश कुमार यांनी वारंवार घेतलेल्या पलटीमुळे बिहारच्या राजकारणात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे, पण ती भरताना त्यांना आपल्याच मित्रपक्षांच्या महत्त्वाकांक्षेचा सामना करावा लागत आहे. चिराग पासवान असोत किंवा उपेंद्र कुशवाह, हे सर्व प्रादेशिक नेते भाजपच्या आधाराने आपली गणिते मांडत आहेत. अशा वेळी, भाजपला स्वतःचा मुख्यमंत्री बसवण्याचे स्वप्न पाहताना या 'छोट्या भावां'ना सांभाळताना नाकी नऊ येत आहेत.

'सिग्निफिकन्स' किंवा महत्त्व कशात आहे? तर भाजप आता बिहारमध्ये केवळ एक पर्याय राहिलेला नाही, तर तो केंद्रस्थानी आला आहे. काँग्रेसची स्थिती तिथे केविलवाणी आहे आणि डावे पक्ष विशिष्ट खिशातच मर्यादित आहेत. त्यामुळे मुख्य लढत आता भाजप विरुद्ध आरजेडी अशीच होताना दिसते. ही द्विध्रुवीय लढत भाजपसाठी सोपी नाही. कारण, तेजस्वी यादव यांनी आता केवळ जातीय समीकरणे न मांडता 'बेरोजगारी' आणि 'विकास' या मुद्द्यांना हात घातला आहे. युवकांमध्ये त्यांची वाढती लोकप्रियता ही भाजपच्या पारंपरिक मतपेढीला सुरुंग लावणारी ठरू शकते. भाजपकडे बिहारमध्ये आजही असा एकही चेहरा नाही, जो संपूर्ण राज्याला आपला वाटेल आणि जो लालूप्रसाद किंवा नितीश कुमार यांच्या उंचीचा असेल. उपमुख्यमंत्र्यांच्या रांगा लावून किंवा दिल्लीतून आदेश देऊन राज्य चालवता येते, पण लोकांच्या मनात स्थान मिळवता येत नाही.

बिहारमध्ये भाजपने एक मोठी झेप घेतली आहे यात शंका नाही. त्यांनी जुन्या दिग्गज नेत्यांना बाजूला सारून नवी फळी उभी केली आहे. मात्र, ही फळी अद्याप कसोटीला उतरलेली नाही. बिहारचा मतदार हा अत्यंत सुज्ञ आणि तितकाच अनपेक्षित धक्का देणारा आहे. आज जे चित्र भाजपला अनुकूल वाटत आहे, ते उद्या सामाजिक समीकरणांच्या एका फटक्यात बदलू शकते. सत्तेच्या सोपानावर चढणे सोपे असते, पण बिहारसारख्या निसरड्या जमिनीवर पाय रोवून उभे राहणे हीच खरी मुत्सद्देगिरी आहे. ही मुत्सद्देगिरी दिल्लीतील चाणक्यांना कितपत जमते, यावरच बिहारचे भविष्य अवलंबून आहे. जोपर्यंत 'पाटण्याचे मळभ' दूर होत नाही, तोपर्यंत दिल्लीच्या स्वप्नांना पूर्ण फळ लाभणार नाही, हेच सत्य आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगिण विकासाला चालना

## पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील कामांना स्थायी समितीची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समितीची सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली. सभेच्या प्रारंभी दिवंगत गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेला महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत



शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व प्रशासनाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

झोपडपट्टी व दाट वस्ती भागांमध्ये गटार बांधकाम, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे, सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती, रंगरंगोटी तसेच मनपा इमारतींची देखभाल ही कामे स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत विविध प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार आहेत. सिद्धार्थनगर, गुलाबनगर, जयभीमनगर, महात्मा फुलेनगर, भारतमातानगर, राजीव गांधीनगर आदी परिसरांचा यामध्ये समावेश आहे. रस्ते व वाहतूक सुधारण्यासाठी निगडी-दापोडी मार्गावरील बसस्थानक व डेडिकेटेड लेन दुरुस्ती, सांगवी-किवळे रस्त्याचे डांबरीकरण, तसेच चिखली, मोशी, जाधववाडी, रावेत, किवळे, वाकड, ताथवडे आदी भागांतील अंतर्गत रस्त्यांचे काम हाती घेण्यास मान्यता देण्यात आली. पिंपळे निलख, विशालनगर, कस्पटेवस्ती परिसरात पावसाळी पाण्याच्या निचऱ्यासाठी नवीन पाईपलाईन व फूटपाथ दुरुस्तीची कामेही करण्यात येणार आहेत.

वाहतूक व्यवस्थापनाच्या दृष्टीने पिंपळे सौदागर येथील पीके चौक सिग्नल फ्री करण्यासाठी तसेच पिंपळे गुरव येथे सबवे उभारण्यासाठी सल्लागार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात रेलिंग उभारण्यासही मंजुरी देण्यात आली. आरोग्य क्षेत्रात आकुर्डी येथील कै. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय व भोसरी येथील नवीन रुग्णालयासाठी आवश्यक उपकरणे खरेदी, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन तसेच थेरगाव येथे ३४० खाटांच्या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयासाठी फर्निचर खरेदीस मान्यता देण्यात आली. तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे मानधन तत्त्वावर पदभरती करण्यासही मंजुरी देण्यात आली.

स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीने महिला बचत गटांना मुदतवाढ व मानधनवाढ, शून्य कचरा प्रकल्पांतर्गत शाळांमध्ये उपक्रम राबविणे, तसेच शहरातील साफसफाई, अतिक्रमणविरोधी कारवाई, अग्निशमन वाहन दुरुस्ती, स्मशानभूमी सुधारणा आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासही मंजुरी देण्यात आली. याशिवाय, पीएमपीएमएलच्या २०२५-२६ आर्थिक वर्षातील तुटीसाठी अनुदान देण्यास तसेच विविध शासकीय शुल्क भरण्यास मान्यता देण्यात आली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये इंग्रजी माध्यमाच्या १० शाळा अनधिकृत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील १० खाजगी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा शासनाची आवश्यक परवानगी न घेता अनधिकृतरित्या सुरू असल्याचे उघड झाले आहे.

संबंधित शाळांना यापूर्वीच शाळा बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही या शाळा नियमबाह्य पद्धतीने सुरू ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. पालकांनी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असून, अशा शाळांमध्ये प्रवेश दिल्यास होणाऱ्या नुकसानीस पालक स्वतः जबाबदार राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.


अनधिकृत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये ब्लोमिंग बर्ड्स (ताथवडे), लिटील स्टार इंग्लिश मीडियम स्कूल (चिंचवडेनगर), माऊंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल व डी. एम. के. इंटरनॅशनल स्कूल (कासारवाडी), माने इंग्लिश मीडियम स्कूल (काळेवाडी), नर्चर इंटरनॅशनल स्कूल व माईंडवर्ल्ड इंटरनॅशनल स्कूल (काळजेवाडी, चऱ्होली), हेम्स इंटरनॅशनल स्कूल (वाकड), कॅटलिस्ट इंटरनॅशनल स्कूल (चऱ्होली फाटा) आणि गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल (मोशी) यांचा समावेश आहे.

# उष्णतेच्या पार्श्वभूमीवर सतर्कतेचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून उष्माघाताचा धोका वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिका च्या वैद्यकीय विभागाने नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. योग्य काळजी घेतल्यास उष्माघातासारख्या गंभीर आजारापासून बचाव करता येऊ शकतो, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

उष्माघात ही गंभीर आरोग्य समस्या असून शरीराचे तापमान अत्यंत वाढल्यास चक्कर येणे, अशक्तपणा, उलट्या, डोकेदुखी, गोंधळ होणे किंवा बेशुद्धावस्था अशी लक्षणे दिसू शकतात.



अशी लक्षणे आढळल्यास त्वरित सावलीत जाऊन प्राथमिक उपचार घ्यावेत आणि जवळच्या महापालिका रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून आपत्कालीन परिस्थितीसाठी आरोग्य यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर उपचार घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्य संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. संभाव्य उष्माघाताच्या घटनांचा विचार करून सर्व रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी आणि त्रास जाणवल्यास तातडीने उपचार घ्यावेत, असे त्यांनी आवाहन केले. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी उष्माघात ही टाळता येण्याजोगी पण गंभीर समस्या असल्याचे सांगितले. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. शरीरातील पाण्याची कमतरता आणि अतिउष्णतेमुळे विविध लक्षणे दिसू शकतात, त्यामुळे ती जाणवताच विलंब न करता सावलीत विश्रांती घेऊन त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, भरपूर पाणी व द्रवपदार्थ घ्यावेत, हलक्या रंगाचे सूती कपडे परिधान करावेत तसेच डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा, असेही आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घेणे अत्यावश्यक असल्याचेही महापालिकेने अधोरेखित केले आहे.

# ऑनलाईन गुंतवणुकीच्या आमिषाने महिलेला लाखोंचा गंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शेअर मार्केटमध्ये जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची लाखोंची फसवणूक झाल्याची घटना हिंजवडी परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा क्रमांक २३३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ च्या कलम ६६(ब) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना ३० एप्रिल २०२५ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत घडली.

फिर्यादी महिला आपल्या घरी असताना आरोपींनी





मोबाईल फोन व मेसेजद्वारे संपर्क साधला. त्यांनी स्वतःला नामांकित शेअर व स्टॉक ब्रोकिंग कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवून शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विश्वास संपादन करण्यासाठी सुरुवातीला फिर्यादीकडून डिमॅट खाते उघडून घेण्यात आले. यानंतर टप्प्याटप्प्याने सुमारे तीन लाख रुपयांची रक्कम गुंतवणुकीच्या नावाखाली स्वीकारण्यात आली. पुढे अधिक परताव्याचे आमिष दाखवत वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये आणखी पैसे जमा करण्यास सांगण्यात आले. मात्र, गुंतवणुकीवर कोणताही परतावा न मिळाल्याने आणि संशय निर्माण झाल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तपासात ही फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले असून, पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### पिंपरीत तरुणावर जीवघेणा हल्ला

**पिंपरी:** शहरातील भटनगर परिसरात एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाणे येथे दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १४ एप्रिल २०२६ रोजी पहाटे सुमारे ४.४५ वाजता भटनगर येथील बिल्डिंग क्रमांक ७ जवळ घडली. याप्रकरणी राज महेश कजानिया (वय २४, रा. निराधार नगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा मित्र विश्वास शिंदे (वय २८) याच्यावर आरोपी अक्षय बाबू पांढरे (वय २२) आणि ऋतिक बाबू पांढरे (वय १९) यांनी लाकडी दांडे आणि लोखंडी रॉडने हल्ला केला. जुन्या वादातून हा हल्ला करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आरोपींनी विश्वास शिंदे यांच्या डोक्यावर वार करत त्यांना गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर परिसरात दहशत निर्माण करत आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. "आमच्याविरुद्ध कोणी आले तर संपवू," अशी धमकीही त्यांनी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींपैकी ऋतिक पांढरे याला पोलिसांनी अटक केली आहे. दुसरा आरोपी अक्षय पांढरे याचा शोध सुरू असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे करत आहेत.

### हत्यारासह फिरताना तरुण अटकेत

**पिंपरी:** पिंपरी-चिंचवड परिसरात धारदार हत्यारासह फिरणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई १४ एप्रिल रोजी पहाटे संत तुकारामनगर परिसरात करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहरू नगर रोडवरील बी.एस. ग्राउंडजवळ एक तरुण संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याची तपासणी करण्यात आली. त्याच्याकडे लोखंडी धारदार हत्यार आढळून आले. संबंधित तरुणाचे नाव पवन सचिन ससाणे (वय २१, रा. गांधी नगर, पिंपरी) असे आहे. आरोपीवर यापूर्वीच तडीपार आदेश लागू करण्यात आला होता. तरीही त्याने आदेशाचे उल्लंघन करून पिंपरी-चिंचवड हद्दीत प्रवेश केल्याचे निष्पन्न झाले. याशिवाय, कोणताही वैध परवाना नसताना त्याच्याकडे हत्यार आढळल्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# म्हाळुंगे येथे जुगार अड्ड्यावर छापा; तिघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड परिसरातील म्हाळुंगे येथे बेकायदेशीर जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकत तिघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी म्हाळुंगे पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक २९५/२०२६ नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे १०.१५ वाजता निगडी-म्हाळुंगे परिसरातील महिंद्रा कंपनी गेट क्रमांक २ समोरील स्वामी चहा जवळील फुटपाथवर करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळवला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने छापा टाकला.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी अमोल श्रीकांत वेटाळ (वय ३५) यांनी फिर्याद दिली आहे. कारवाईदरम्यान आयुब युसुफ खान (वय ५५), गणेश सुरेश धांडे (वय २६) आणि सुनील रज्जू साहू या तिघांना ताब्यात घेण्यात आले. तिघेही म्हाळुंगे परिसरातील रहिवासी असून, स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर जुगार सुरू केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी छाप्यात जुगार साहित्य तसेच सुमारे ३२०० रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे.

संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२(अ) आणि इतर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### सासवडजवळ महिलेला मारहाण

**सासवड :** "तू आमचे वाटोळे केले आहेस," असे म्हणत एका महिलेला काठीने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना पुरंदर तालुक्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी एका महिलेसह दोघांविरुद्ध सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना वीर (ता. पुरंदर) येथील इंदिरानगर परिसरात मंगळवारी (ता. १४) रात्री ८ वाजल्यापासून बुधवारी (ता. १५) सकाळी साडेसात वाजेपर्यंतच्या दरम्यान घडली. या प्रकरणात लिला दिनेश सावंत (वय ४५, व्यवसाय मजुरी, रा. इंदिरानगर, वीर) या जखमी झाल्या असून त्यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपी ताराबाई जालिंदर माळवे आणि जालिंदर रघुनाथ माळवे यांनी जुन्या वादाच्या कारणावरून सावंत यांच्याशी वाद घालत "तू आमचे वाटोळे केले आहेस" असे म्हणत काठीने त्यांच्या डोक्यात मारहाण केली.

### कालव्याचे कुलूप तोडून पाणी सोडले

**उरुळी कांचन :** मुठा कालव्याच्या दरवाजाचे कुलूप तोडून बेकायदेशीरपणे पाणी सोडल्याची धक्कादायक घटना उरुळी कांचन (ता. हवेली) येथील खेडेकर मळा परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे सिंचन विभागाच्या पाणी वितरण व्यवस्थेत मोठा बिघाड निर्माण झाला असून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मंगळवारी दुपारी २ वाजल्यापासून बुधवारी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली. अजिंठा लॉन्ड्री शेजारील जुना मुठा कालवा वितरिका क्रमांक ५० (कि.मी. ६०/२००) येथे अज्ञात व्यक्तीने दरवाजाचे कुलूप तोडून कालव्यातील पाणी विनापरवाना सोडले. या प्रकारामुळे नियोजित पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पाण्याच्या वाटपात अनियमितता निर्माण झाली आहे.

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघातांचा धोका वाढला

# लागाचा घाट रस्ता पूर्णत: खचला...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** ओतूर ते ब्राम्हणवाडा या महत्त्वाच्या जिल्हा मार्गावरील लागाचा घाट सध्या अक्षरशः खड्ड्यांनी विद्रूप झाला असून वाहनचालकांना अत्यंत धोकादायक परिस्थितीतून प्रवास करावा लागत आहे. पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांच्या सीमेवरील हा घाटरस्ता वाहतुकीसाठी महत्त्वाचा असला तरी त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कथित दुर्लक्षामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

घाटातील आंबेगव्हाण फाटा ते जुन्नर तालुक्याच्या हद्दीपर्यंतचा रस्ता मोठ्या प्रमाणावर उखडला गेला असून अनेक ठिकाणी डांबरीकरण पूर्णपणे नष्ट झाले आहे. रस्त्यावर मोठ्या व्यासाचे खोल खड्डे पडले असून काही ठिकाणी खडी वर आली आहे. त्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे संतुलन बिघडून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. वाहनांचे वारंवार बिघाड होत असून चालकांना आर्थिक फटका बसत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्याची अवस्था सतत खालावत आहे. मात्र, संबंधित प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही ठोस दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे "अधिकाऱ्यांचे हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे का?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या घाट परिसराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे मोठ्या प्रमाणावर जंगल क्षेत्र असून हा भाग बिबट्या प्रवरण क्षेत्र म्हणून घोषित आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळीच नव्हे, तर दिवसा देखील वन्य प्राण्यांचा वावर आढळतो. अशा परिस्थितीत जर वाहन खड्ड्यांमुळे बंद पडले, तर प्रवाशांना जीव धोक्यात घालून मदतीची वाट पाहावी लागते. त्यामुळे हा प्रश्न केवळ रस्त्याच्या दुरुस्तीपुरता मर्यादित नसून थेट नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित बनला आहे.

घाटरस्त्याच्या दुरवस्थेमुळे स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच या मार्गावरून मालवाहतूक करणाऱ्या वाहनांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी स्थानिक अर्थकारणावरही त्याचा परिणाम होत असल्याचे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर रोहोकडीचे माजी सरपंच सचिन घोलप, सुदाम घोलप, सुनीता घोलप, आंबेगव्हाणचे उपसरपंच राजेंद्र गायकर, माजी सरपंच निवृत्ती धराडे, सामाजिक कार्यकर्ते वाय. जी. गायकर, निलेश महाले, पांडू गवांदे तसेच लहित खुर्दचे माजी सरपंच डॉ. सुभाष गोडसे, सुरेखा गोडसे आदींनी प्रशासनाकडे तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

लागाचा घाट हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या रस्त्याचे काम तातडीने हाती घेणे अत्यावश्यक बनले आहे.

## जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** एप्रिलच्या सुरुवातीलाच पुणे जिल्ह्यात उन्हाच्या तीव्र झळा जाणवू लागल्या असून तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून जलसाठे, शेती आणि व्यापार क्षेत्रावरही त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत.

उन्हाच्या तीव्रतेमुळे धरणांमधील पाण्याचे बाष्पीभवन वाढले आहे. जिल्ह्याची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरण साखळीतील पाणीसाठा झपाट्याने घटत आहे. याशिवाय भाटघर, नीरा देवघर, गुंजवणी आणि चासकमान या धरणांतील पातळीतही लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागात शेतीला सर्वाधिक फटका बसत आहे. कडक उन्हामुळे पिकांना पाणी देण्याच्या वेळा बदलाव्या लागत असून विहिरींच्या पातळीत घट झाल्याने फळबागा टिकवणे अवघड झाले आहे. विशेषतः डाळिंब, द्राक्षे आणि केळी पिकांवर त्याचा परिणाम होत असून उत्पादन घटण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. उष्णतेचा परिणाम बाजारपेठांवरही जाणवत आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून कापड, इलेक्ट्रॉनिक्ससह विविध व्यवसायांमध्ये ग्राहकांची संख्या घटली आहे. यात्रा-जत्रांमधील गर्दीही कमी झाली असून दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत व्यापार ठप्प असल्याचे चित्र आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच पशुधनाची काळजी घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. वाढत्या उष्णतेमुळे आरोग्य आणि पाणी व्यवस्थापन या दोन्ही बाबींसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## आंबेगावात उन्हाळी बाजरी काढणीला वेग



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या उन्हाळी हंगामातील बाजरी काढणीची कामे वेगाने सुरू असून, यंदा उत्पादनवाढीच्या अपेक्षेमुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनुकूल हवामान आणि मुबलक पाण्याची उपलब्धता यामुळे बाजरी पिकाची वाढ चांगली झाली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

तालुक्याच्या पूर्व भागातील थोरांदळे, खडकी, रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे आणि पारगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर बाजरी काढणी सुरू आहे. शेतात मजुरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असून शेतीकामांना वेग आला आहे. यंदा बाजरीसोबतच गहू पिकालाही स्वच्छ आणि स्थिर हवामानाचा मोठा फायदा झाला. त्यामुळे गव्हाच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दोन्ही प्रमुख पिकांचे उत्पादन वाढल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बाजारात धान्याच्या किमतीत होत असलेली वाढ ही शेतकऱ्यांसाठी सकारात्मक बाब ठरत आहे. वाढत्या बाजारभावामुळे पिकांना चांगला दर मिळण्याची अपेक्षा असून उत्पादनवाढ आणि दरवाढ यांचा दुहेरी फायदा मिळणार असल्याचे चित्र आहे. यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी समाधानकारक ठरत असून काढणीच्या कामांमुळे ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# श्री शिखर शिंगणापूर कावड यात्रेची सांगता

## शिरदाळेतील शेकडो भाविकांचा यात्रेत सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर कावड यात्रेचा शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे त्रयोदशीच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने समारोप करण्यात आला. चैत्र महिन्यात साजरी होणारी ही यात्रा दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडते.

शिरदाळे गावातील शेकडो भाविक मानाची कावड घेऊन या यात्रेत सहभागी होतात. रणपिसे, सरडे, तांबे, चौधरी, मिंडे, काचोळे आदी कुटुंबीयांचा यात्रेत विशेष सहभाग असतो. कामदा एकादशीच्या दिवशी शिरदाळे येथून कावड शिखर शिंगणापूरकडे प्रस्थान करते.

द्वादशीला मंदिरात कावड पताका दर्शन घेऊन महाप्रसादाचे आयोजन केले जाते. त्यानंतर यात्रा परतीच्या मार्गाला लागते. परतीच्या प्रवासात भाविकांकडून गोंदवलेकर महाराज आणि जेजुरी येथे दर्शन घेतले जाते. गावात परतल्यानंतर दहा दिवस कावडीची मनोभावे पूजा केली जाते. त्यानंतर त्रयोदशीच्या दिवशी कावड शेतातील त्रीलिंगी वनदेव महादेव मंदिरात नेली जाते. येथे शेकडो वर्षांची अभिषेकाची परंपरा जपली जाते. या वेळी अंबिल, घुगऱ्या आणि शिऱ्याचा प्रसाद वाटण्यात येतो. गुलालाची उधळण करत तरुणांकडून कावड नाचवली जाते. त्यानंतर गावातील विविध मंदिरांना प्रदक्षिणा घालत कावड ग्रामदैवत हनुमान मंदिर चौकात आणली जाते. येथेही कावड नाचवून उत्सवाचा समारोप केला जातो.

संपूर्ण गावात भक्तिमय आणि आनंदी वातावरण निर्माण झाले होते. ही यात्रा शेकडो वर्षांची परंपरा जपत आजही सुरू असून भाविकांसाठी ती विनामूल्य आयोजित केली जाते. गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे महाप्रसाद आणि इतर व्यवस्था करण्यात येते. यात्रेतील तरुण सहभागी मयूर सरडे यांनी सांगितले की, ही परंपरा जपण्यासाठी नव्या पिढीचाही उत्स्फूर्त सहभाग वाढत आहे.

## 'समता रॅली'त विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' आणि 'सर्वांना शिक्षण, सर्वांना काम' या घोषणांनी जुन्नर शहर दणाणून गेले, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया पुणे जिल्हा समितीच्या ३०व्या जिल्हा अधिवेशनाला उत्साहात सुरुवात झाली. अधिवेशनाच्या प्रारंभी शहरातून काढण्यात आलेल्या भव्य 'समता रॅली'त विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांवर आवाज उठवला.

येथील श्री तुळजाभवानी सभागृहात उद्घाटन सत्र पार पडले. अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय नेत्या कॉ. मरियम ढवळे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका करत उद्योगपतींच्या हिताला प्राधान्य दिले जात असून सामान्य जनतेचे प्रश्न दुर्लक्षित होत असल्याचा आरोप केला. शिक्षणाचे वाढते खासगीकरण आणि नोकऱ्यांचे




कंत्राटीकरण यामुळे विद्यार्थी-युवक गंभीर अडचणीत सापडत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष संस्कृती गोडे होत्या, तर प्रास्ताविक जिल्हा सचिव अक्षय घोडे यांनी केले. यावेळी एसएफआयचे महाराष्ट्र राज्य सचिव सोमनाथ निर्मळ, राज्य उपाध्यक्ष भास्कर म्हसे, माजी जिल्हा सचिव गणेश दराडे आणि माजी जिल्हाध्यक्ष गणपत घोडे यांनीही मार्गदर्शन करत अधिवेशनास शुभेच्छा दिल्या.

'अभ्यास आणि संघर्ष' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या अधिवेशनात जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या, विद्यार्थ्यांच्या सुविधा, शिक्षणाचे बाजारीकरण आणि रोजगाराच्या संधी यावर सखोल चर्चा होणार आहे. पुढील दोन दिवसांत संघटनात्मक बांधणी आणि आगामी आंदोलनांची दिशा ठरवण्यासाठी विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अधिवेशनासाठी पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून विद्यार्थी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित झाले आहेत. उद्घाटन सत्रात किसान सभेचे लक्ष्मण जोशी, आदिवासी अधिकार मंचचे संजय साबळे, डीवायएफआयचे विलास साबळे, राजू शेळके, तसेच एसएफआयचे राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारगाव उपसरपंचांविरुद्धचा अविश्वास ठराव फेटाळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच नितीन मारुती ढोबळे यांच्याविरोधात मांडण्यात आलेला अविश्वास ठराव फेटाळण्यात आला असून, त्यांचे उपसरपंच पद कायम राहिले आहे. आवश्यक बहुमत न मिळाल्याने हा ठराव अपयशी ठरला.

ग्रामपंचायतीच्या एकूण १५ सदस्यांपैकी १२ सदस्यांनी उपसरपंचांविरोधात अविश्वास ठराव दाखल करत मनमानी कारभार, बैठका वेळेवर न घेणे आदी कारणे दिली होती. या पार्श्वभूमीवर विशेष सभेची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार सोमवारी (दि. १३) ग्रामपंचायत कार्यालयात नायब तहसीलदार शांता असवले यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी के. डी. भोजणे उपस्थित होते. सभेत गुप्त मतदानाद्वारे अविश्वास ठरावावर निर्णय घेण्यात आला. मतदानात ठरावाच्या बाजूने १० मते पडली, तर विरोधात ५ मते पडली. मात्र, नियमानुसार ठराव मंजूर होण्यासाठी एकूण सदस्यसंख्येच्या तीन चतुर्थांश म्हणजे किमान ११ मतांची आवश्यकता होती. प्रत्यक्षात आवश्यक संख्या पूर्ण न झाल्याने अविश्वास ठराव फेटाळण्यात आला.

नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत नितीन ढोबळे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली होती. त्यानंतर अलीकडेच सरपंच श्वेता ढोबळे यांनी पंचायत समिती निवडणुकीत विजय मिळवून सरपंचपदाचा राजीनामा दिल्याने सध्या ग्रामपंचायतीतील राजकीय समीकरणे बदलली आहेत. या पार्श्वभूमीवर मांडण्यात आलेला अविश्वास ठराव अपयशी ठरल्याने नितीन ढोबळे यांचे पद कायम राहिले आहे.

## श्री कानिफनाथ यात्रोत्सव उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील चांडोली बु. येथे जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामदैवत श्री कानिफनाथ महाराजांचा वार्षिक यात्रोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडला. पारंपरिक धार्मिक विधींसह सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल पाहायला मिळाली.

या यात्रोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले ते गावातील हौशी कलाकारांनी सादर केलेले नाट्यप्रयोग. सुमारे शंभर वर्षांची परंपरा असलेली ही नाट्यसंस्कृती आजही तितक्याच जोमाने जपली जात आहे. यंदा सादर करण्यात आलेल्या 'फकिरा' या नाटकाने प्रेक्षकांची मने जिंकली. नाटकात रूपेश थोरात यांनी नायकाची भूमिका प्रभावीपणे साकारली, तर शंकर ठोंबरे यांनी सहनायकाची भूमिका समर्थपणे उभी केली. प्रभाकर गायकवाड यांनी खलनायकाच्या भूमिकेतून



ब्रिटिशकालीन पाटलाचे दमदार चित्रण साकारले. बाळासाहेब अभंग आणि दिनेश टेमगिरे यांनी विनोदी भूमिकांमधून प्रेक्षकांना खळखळून हसवले.

अदिनाथ थोरात यांनी समाजातील दुर्बल घटकांचे शोषण वास्तववादी पद्धतीने मांडले. कल्पेश गुंजाळ, केतन काळे, समर्थ थोरात आणि ओंकार दळवी यांनीही आपल्या भूमिकांना न्याय देत नाटक अधिक रंगतदार केले. रमेश थोरात यांनी आपल्या अभिनयातून करुण रस साकारत प्रेक्षकांना भावनिक केले. या नाट्यप्रयोगाचे दिग्दर्शन शरद राजगुरव यांनी केले. मार्गदर्शक म्हणून सुभाष थोरात, चंद्रकांत गायकवाड, शशिकांत थोरात, दत्तात्रेय राजगुरव आणि बाळासो वाघ यांनी मोलाचे योगदान दिले.

यात्रोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री कान्होबा तरुण उत्कर्ष मंडळ, श्री कान्होबा देवस्थान ट्रस्ट तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम घडवणारा हा यात्रोत्सव ग्रामस्थांसाठी अविस्मरणीय ठरला.

## भाविक, अभ्यासकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# आळंदीत बहुभाषिक कीर्तन महोत्सवाची पर्वणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी येथील जानकाई वेदांत स्वाध्याय प्रतिष्ठानच्या वतीने १२ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत बहुभाषिक कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या महोत्सवाला भाविक, उपासक आणि अभ्यासकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महोत्सवाची सांगता १९ एप्रिल रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. डॉ. सुभाष महाराज



गेठे यांनी दिली.

पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. गेठे यांनी महोत्सवाची माहिती दिली. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश तात्या काळे, प्रा. श्रीधर घुंडरे पाटील आणि अर्जुन मेदनकर उपस्थित होते.

डॉ. गेठे म्हणाले की, गेल्या दशकभरापासून प्रतिष्ठान आळंदी परिसरात संत विचारांचा प्रसार करण्याचे कार्य करत आहे. संत साहित्य विविध भाषांमध्ये पोहोचावे यासाठी मराठीबरोबरच हिंदी आणि इंग्रजी भाषेत अनुवादाचे काम सुरू आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचे पसायदान, हरिपाठ आणि चांगदेव पासष्टी यांसारख्या ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर करून प्रकाशन करण्यात आले आहे. तसेच युवक-युवतींसाठी संस्कारवर्धन, नैतिक मूल्ये आणि अध्यात्मिक ज्ञान देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. "ओळख श्री ज्ञानेश्वरीची" आणि "ओळख श्री हरिपाठाची" हे उपक्रम राज्यातील सुमारे १६० शाळांमध्ये सुरू असून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंवर्धनाचा प्रयत्न केला जात आहे.


या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी, हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी अशा चार भाषांमध्ये कीर्तन सेवा सादर केली जात आहे. सुमारे १५ मान्यवर कीर्तनकार यामध्ये सहभागी झाले असून, शांतीब्रह्म ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर, डॉ. नारायण महाराज जाधव, डॉ. अभय टिळक यांसारख्या मान्यवरांची कीर्तन सेवा होणार आहे. यावर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान व संस्कृत विभागाच्या सहकार्याने अभ्यासक-उपासक परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांच्या इंग्रजी कीर्तनाने झाली असून, १९ एप्रिल रोजी हरिनाम गजरात काल्याचे कीर्तन व महाप्रसाद वितरणाने सांगता होणार आहे. या महोत्सवात भाविक, नागरिक, अभ्यासक आणि उपासकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा २५ एप्रिल रोजी : खाडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** पुणे येथील नौरोसजी वाडिया कॉलेजच्या सर्वोत्कृष्टता केंद्राच्या वतीने महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा (एमटीएसई) येत्या २५ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती तालुका समन्वयक भाऊसाहेब खाडे यांनी दिली.

इयत्ता आठवी, नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा दरवर्षी एप्रिलच्या अखेरीस घेतली जाते. ग्रामीण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेणे, त्यांचा स्पर्धा परीक्षांचा पाया भक्कम करणे आणि शिष्यवृत्ती व पारितोषिकांच्या माध्यमातून त्यांना प्रोत्साहन देणे हा



या परीक्षेचा उद्देश आहे. या परीक्षेची प्रवेशपत्रे १५ एप्रिल २०२६ पासून संकेतस्थळावर उपलब्ध झाली आहेत. यावर्षी चैतन्य विद्यालय ओतूर, श्री अनंतराव कुलकर्णी इंग्रजी माध्यम शाळा नारायणगाव आणि ज्ञान मंदिर हायस्कूल आळे येथे परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी २५ एप्रिल रोजी सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत आपल्या संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### पंजाबमध्ये शाळांना बॉम्बच्या धमक्या

**चंदीगड:** चंदीगड आणि पंजाबच्या बरनाला येथील अनेक शाळांना गुरुवारी बॉम्बच्या धमकीचे ईमेल आले होते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मात्र, तपासणीअंती कोणतीही संशयास्पद गोष्ट आढळली नाही. धमक्यांची माहिती मिळाल्यानंतर, बॉम्ब निकामी करणारी पथके, श्वान पथके आणि पोलीस, रुग्णवाहिका व अग्निशमन दलासह इतर पथकांना तातडीने शाळांमध्ये पाठवण्यात आले.

### राजकीय संतुलन बदलण्याचा कट

**नवी दिल्ली** : डाव्या नेत्यांनी गुरुवारी महिला आरक्षणाला नव्या मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेशी जोडण्याच्या केंद्राच्या निर्णयावर टीका केली. महिला हिताच्या सुधारणेच्या नावाखाली भारताचे राजकीय संतुलन बदलण्याचा हा एक 'कपटी' आणि 'दुष्ट' प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सीपीआय-एमचे महासचिव एम. ए. बेबी म्हणाले की, सध्याचा प्रस्ताव पूर्वीच्या प्रयत्नांपासून भरकटलेला आहे, ज्या प्रयत्नांमध्ये विधिमंडळात महिला आरक्षण लागू करण्यासाठी आधीच एक स्पष्ट आराखडा मांडण्यात आला होता. गीता मुखर्जी समितीच्या अहवालाचा संदर्भ देत बेबी म्हणाले की, महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी आपण नेमके काय केले पाहिजे, याबद्दल त्यात अगदी स्पष्ट माहिती होती.

### मुख्यमंत्री नायडू जनगणनेत सहभागी

**अमरावती** : मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी गुरुवारी जनगणना २०२७ च्या स्वयं-गणना प्रक्रियेत भाग घेतला आणि घर सूची व गृहगणनेअंतर्गत तपशील सादर केला. राज्यात जनगणनेचा पहिला टप्पा सुरू झाला असून, त्यात घरांची यादी तयार करणे आणि घरांसंबंधी माहिती गोळा करणे यांचा समावेश आहे. "आज जनगणनेसाठी स्वयं-गणना सुरू झाल्याने मुख्यमंत्री नारा चंद्रबाबू नायडू यांनी ऑनलाइन पोर्टलवर आपल्या तपशिलाची नोंदणी केली," असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### विरोधकांना पंतप्रधान मोदी यांचा इशारा

# महिला आरक्षणाला राजकीय रंग नको

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : संसदेत सुरू असलेल्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षणासंदर्भातील विधेयकांवर चर्चा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांना स्पष्ट आवाहन केले की, या महत्त्वाच्या कायद्याला राजकीय रंग देऊ नये. तसेच, यापूर्वी महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना निवडणुकांमध्ये फटका बसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

लोकसभेतील चर्चेदरम्यान बोलताना मोदी म्हणाले की, महिला आरक्षण कायद्यात सुधारणा आणि सीमांकन आयोग स्थापन करण्यासंबंधी सादर करण्यात आलेल्या तीन विधेयकांना विरोध केल्यास विरोधकांना "दीर्घकाळ किंमत मोजावी लागेल. महिला आरक्षणाचा मुद्दा ज्या वेळी चर्चेत आला, त्या वेळी ज्यांनी त्याला विरोध केला, त्यांना देशातील महिलांनी कधीही माफ केले नाही. त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये त्यांची मोठी हानी झाली," असे मोदी म्हणाले.

गेल्या काही दशकांत महिलांचे नेतृत्व तळागाळातून उभे राहत असल्याचे अधोरेखित करत त्यांनी सांगितले की, "महिला केवळ संसदेतच नाहीत, तर समाजातील निर्णय प्रक्रियेतही प्रभावी भूमिका बजावत आहेत. त्यामुळे आज या विधेयकाला विरोध करणाऱ्यांना त्याची राजकीय किंमत चुकवावी लागेल." मतदारसंघ पुनर्रचनेच्या (सीमांकन) मुद्द्यावरून व्यक्त होत असलेल्या शंकांवर बोलताना पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, या प्रक्रियेमुळे कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही. "उत्तर, दक्षिण, पूर्व किंवा पश्चिम—लहान किंवा मोठे कोणतेही राज्य असो, या प्रक्रियेत कुणावरही अन्याय होणार नाही," असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, लोकसभेतील जागांचे प्रमाण कमी होणार नसून, वाढ देखील समान प्रमाणात होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विरोधकांना टोला लगावत मोदी म्हणाले की, "तुम्ही या विधेयकाला विरोध केला, तर त्याचा राजकीय फायदा मला होणे स्वाभाविक आहे. पण जर तुम्ही साथ दिली, तर कोणालाही स्वतंत्रपणे राजकीय लाभ मिळणार नाही, तो देशाच्या लोकशाहीचा विजय असेल." याचबरोबर, सरकारला या विधेयकाचे श्रेय नको असून विरोधकांनीही ते स्वीकारावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. "तुम्ही 'हमी' किंवा 'वचन' हवे असेल, तर मी ते देण्यास तयार आहे. हेतू स्पष्ट असेल, तर शब्दांशी खेळण्याची गरज नसते," असे ते म्हणाले.

महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीसंदर्भात बोलताना मोदी म्हणाले की, "२०२४ मध्ये हे शक्य झाले नाही, पण २०२९ पर्यंत आपल्याकडे वेळ आहे. आणखी विलंब करणे परवडणारे नाही." लोकसभेत सध्या संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६, सीमांकन विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायद्यांतील दुरुस्ती विधेयक चर्चेसाठी मांडण्यात आले आहेत. प्रस्तावानुसार, लोकसभेची सदस्यसंख्या ८१५ पर्यंत वाढवून त्यापैकी २७२ जागा म्हणजेच ३३ टक्के महिलांसाठी राखीव ठेवण्याचा विचार आहे.

या पार्श्वभूमीवर संसदेत महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र राजकीय चकमक रंगण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.

## रॉबर्ट वाड्रा प्रकरणी कारवाईसाठी पुरेसा पुरावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : हरियाणातील गुरुग्राम येथील जमीन व्यवहाराशी संबंधित मनी लॉन्डरिंग प्रकरणात दिल्लीतील विशेष न्यायालयाने उद्योगपती रॉबर्ट वाड्रा आणि इतर आरोपींविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या अंमलबजावणी संचालनालयाच्या तक्रारीची दखल घेतली आहे. प्राथमिक तपासात पुढील कारवाईसाठी पुरेसा पुरावा उपलब्ध आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

राऊज अव्हेन्यू न्यायालयातील विशेष न्यायाधीश सुशांत चंगोत्रा यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला. न्यायालयाने नमूद केले की, ईडीने सादर केलेल्या कागदपत्रांवरून आणि तक्रारीवरून आरोपींविरुद्ध पुढील सुनावणीसाठी आवश्यक ते पुरावे दिसून येतात. त्यामुळे प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग अ‍ॅक्ट अंतर्गत कलम ३ आणि ४ अन्वये गुन्ह्यांची दखल घेण्यात आली आहे. या प्रकरणात वाड्रा यांच्यासह केवळ व्यक्तीच नव्हे तर त्यांच्याशी संबंधित काही कंपन्यांचाही समावेश आहे. विशेषतः 'स्काय लाइट हॉस्पिटॅलिटी' आणि इतर संबंधित कंपन्यांच्या व्यवहारांची चौकशी सुरू आहे.

ईडीच्या आरोपानुसार, २००८ साली गुरुग्राममधील शिकोहपूर येथील जमीन व्यवहारात अनियमितता झाल्याचा संशय आहे. कथितरित्या ही जमीन व्यवहार प्रक्रियेत फसवणूक करून विकत घेतली गेली आणि त्यानंतर मोठ्या नफ्यात विक्री करण्यात आली. न्यायालयाने काही आरोपींना समन्स बजावले असून त्यांना पुढील सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. मात्र एका आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा नसल्याचे नमूद करत त्याला समन्स जारी करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे.

## बदल्यांवर 'सर्वोच्च' शिक्कामोर्तब

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोग यांनी पश्चिम बंगालमधील प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या केलेल्या बदल्यांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालय यांनी गुरुवारी फेटाळून लावली. यामुळे निवडणूक आयोगाच्या निर्णयाला न्यायालयीन मान्यता मिळाली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत तसेच न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, या प्रकरणातील व्यापक कायदेशीर प्रश्न मात्र अनिर्णितच राहतील. ही याचिका कलकत्ता उच्च न्यायालय यांच्या ३१ मार्च रोजीच्या आदेशाला आव्हान देत दाखल करण्यात आली होती. संबंधित जनहित याचिका उच्च न्यायालयाने यापूर्वीच फेटाळली होती. सर्वोच्च न्यायालयानेही तोच निर्णय कायम ठेवत याचिकाकर्त्यांना दिलासा नाकारला.

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत होणार आहेत, तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने प्रशासकीय यंत्रणेतील निष्पक्षता आणि पारदर्शकता राखण्यासाठी काही अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या. या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेत आयोगाच्या अधिकारांना पुन्हा एकदा न्यायालयीन पाठबळ मिळाले असून, निवडणूक व्यवस्थापनात हस्तक्षेप मर्यादित ठेवण्याचा संदेशही यामधून देण्यात आल्याचे मानले जात आहे.

## एका राज्यातील लाभ दुसऱ्या राज्यात नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जोधपूर** : राजस्थान उच्च न्यायालयाने नीट-पीजी प्रवेश प्रक्रियेबाबत महत्त्वपूर्ण निर्णय देत स्पष्ट केले आहे की, एका राज्यात मिळालेला आरक्षणाचा लाभ दुसऱ्या राज्यात लागू होत नाही. या निर्णयामुळे वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेत राज्यनिहाय आरक्षण धोरण अधिक ठळकपणे समोर आले आहे.

न्यायमूर्ती संजित पुरोहित यांच्या एकलपीठाने दिलेल्या निकालात असे नमूद करण्यात आले की, आरक्षण व्यवस्था ही प्रत्येक राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर आधारित असते. त्यामुळे एका राज्यातील मागासवर्गाची स्थिती दुसऱ्या राज्यात तशीच आहे, असे गृहित धरणे योग्य ठरत नाही. या संदर्भात फेडरेशन ऑफ प्रायव्हेट मेडिकल अँड डेंटल कॉलेजेस ऑफ राजस्थान यांनी याचिका दाखल केली होती. या याचिकेत इतर राज्यांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राजस्थानमधील नीट-पीजी समुपदेशन प्रक्रियेत आरक्षणाचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, राजस्थान सरकारने यापूर्वीच स्पष्ट धोरण आखले होते की, राज्याबाहेरील विद्यार्थ्यांना 'जनरल' प्रवर्गातच गणले जाईल. या धोरणालाच न्यायालयाने मान्यता दिली.

आरक्षण राज्यनिहाय वैध असून ते स्थानिक सामाजिक वास्तवावर आधारित असते. इतर राज्यांतील आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजस्थानमध्ये आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. अशा विद्यार्थ्यांना फक्त खुल्या (जनरल) प्रवर्गातूनच स्पर्धा करावी लागेल. कमी पात्रता गुण सवलत फक्त संबंधित राज्यातील आरक्षित गटांसाठीच लागू राहील. हा निर्णय पूर्णपणे 'डोमिसाइल आरक्षण' लागू करत नाही; इतर राज्यांतील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल, मात्र आरक्षणाचा लाभ मिळणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. या निर्णयामुळे राजस्थानमधील एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच आरक्षणाचा लाभ मिळत राहणार आहे. मात्र, इतर राज्यांतील आरक्षित गटातील विद्यार्थ्यांना 'जनरल' प्रवर्गातूनच प्रवेशासाठी स्पर्धा करावी लागणार आहे.

या निकालातून भारतातील संघीय रचनेत आरक्षण धोरणाचे स्वरूप अधोरेखित झाले आहे. प्रत्येक राज्याची सामाजिक रचना आणि मागासवर्गीयांची परिस्थिती वेगळी असल्याने आरक्षणही राज्यनिहायच लागू राहते, हा स्पष्ट संदेश न्यायालयाने दिला आहे.

## संभलमध्ये ईदगाह व इमामबारावर बुलडोझर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ** : उत्तर प्रदेशातील संभल जिल्हा येथे गुरुवारी सकाळी मोठ्या पोलीस बंदोबस्तात ईदगाह आणि इमामबारा ही दोन धार्मिक बांधकामे पाडण्यात आली. प्रशासनाने चार बुलडोझरच्या साहाय्याने ही कारवाई केली असून, संबंधित बांधकामे सरकारी जमिनीवर अनधिकृत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार, ईदगाह सुमारे सात बिघे चराईच्या जमिनीवर उभारण्यात आला होता, तर इमामबारा खतासाठी राखीव असलेल्या जागेवर बांधण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने कारवाईचा निर्णय घेतला. घटनास्थळी पाच पोलीस ठाण्यांतील कर्मचारी आणि प्रांतीय सशस्त्र दलाची एक कंपनी तैनात करण्यात आली होती. संभाव्य तणाव लक्षात घेऊन परिसरात जमलेल्या ग्रामस्थांना पोलिसांनी हटवले. याआधी ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर लेखपाल स्पर्श गुप्ता यांनी १८ जानेवारी रोजी तहसीलदार न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर ३१ जानेवारी रोजी न्यायालयाच्या आदेशानुसार सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध करण्यात आली; मात्र त्यावर कोणताही दावा किंवा हरकती नोंदवण्यात आल्या नव्हत्या. गुरुवारी सकाळी साडेसातच्या सुमारास उपविभागीय अधिकारी निधी पटेल आणि नायब तहसीलदार दीपक कुमार जुराईल पथकासह घटनास्थळी पोहोचले. काही नागरिकांनी स्वतःहून इमामबारा पाडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले; मात्र प्रशासनाने हस्तक्षेप करून ती प्रक्रिया थांबवली आणि अधिकृत कारवाई सुरू ठेवली. दुपारी वरिष्ठ अधिकारी राजेंद्र पेन्सिया आणि कृष्ण कुमार विश्नोई यांनीही घटनास्थळी भेट देऊन कारवाईचा आढावा घेतला.

### सीमांकनाच्या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोप

## महिला आरक्षणावरून खडाजंगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर लोकसभेत सादर करण्यात आलेल्या तीन विधेयकांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र वादंग निर्माण झाला आहे. विशेषतः मतदारसंघ पुनर्रचना आणि आरक्षणाची अंमलबजावणी यावरून दोन्ही बाजूंनी परस्परांवर जोरदार टीका करण्यात आली.

केंद्रीय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लोकसभेत विधेयक मांडताना महिला आरक्षणाचे गणित स्पष्ट केले. लोकसभेची एकूण सदस्यसंख्या ८१५ करण्यात येईल आणि त्यापैकी ३३ टक्के म्हणजेच २७२ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. या निर्णयामुळे कोणत्याही राज्याचे किंवा पुरुषांचे नुकसान होणार नसल्याचा दावा त्यांनी केला. तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांनाही या आरक्षणाचा लाभ मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी या विधेयकांवर तीव्र आक्षेप घेत सरकारवर गंभीर आरोप केले. त्यांनी ही विधेयके महिलाविरोधी, जातिगणनेविरोधी, संविधानविरोधी आणि देशाच्या संघराज्यीय रचनेला धक्का देणारी असल्याचे म्हटले. महिला आरक्षणाच्या नावाखाली सरकार मतदारसंघ पुनर्रचना 'बुलडोझरने' रेटून नेत असल्याचा आरोप त्यांनी केला.

गोगोई यांनी स्पष्ट भूमिका घेत, जर सरकार खरोखरच महिला आरक्षणाबाबत प्रामाणिक असेल, तर ते सध्याच्या ५४३ सदस्यसंख्येच्या आधारे तात्काळ लागू करावे, असे सांगितले. सीमांकन प्रक्रियेशी अंमलबजावणी जोडणे म्हणजे विलंब करण्याचा प्रयत्न असल्याची टीका त्यांनी केली. तसेच त्यांनी जम्मू-काश्मीर आणि आसाममधील मतदारसंघ पुनर्रचनेचा दाखला देत, राजकीय फायद्यासाठी फेररचना केल्याचा आरोप केला. महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली 'प्रतीकात्मक राजकारण' केले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. विरोधकांनी सरकारवर जात जनगणनेपासून दूर राहण्याचा आरोपही केला. सामाजिक प्रतिनिधित्व अधिक बळकट करण्यासाठी जातीनिहाय आकडेवारी आवश्यक असताना, सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे गोगोई यांनी सांगितले.

दरम्यान, महिला आरक्षणाशी संबंधित संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. सुमारे ४० मिनिटांच्या चर्चेनंतर झालेल्या मतविभागणीत या विधेयकाच्या समर्थनार्थ २५१ मते पडली, तर १८५ सदस्यांनी विरोध केला. याशिवाय दिल्ली, पुदुचेरी आणि जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिला आरक्षण लागू करण्यासाठी सीमांकन विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा) विधेयकही सभागृहात सादर करण्यात आले.

## महिला आरक्षण हे एनआरसी लागू करण्याचेच षडयंत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी असा आरोप केला की, महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारी विधेयके आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची स्थापना यांना जोडण्याचे प्रयत्न हे मतदार यादीतून नावे वगळून एनआरसी लागू करण्याच्या एका "षडयंत्राचा" भाग आहेत. पश्चिम बंगालच्या कूचबिहार जिल्ह्यातील माथाभंगा येथे एका निवडणूक सभेला संबोधित करताना ममता यांनी हे विधान केले.

त्या म्हणाल्या की, महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांना जोडून भारताला विभाजित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. "महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांना जोडून भारताला विभाजित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. ही विधेयके जोडणे हा मतदारांची नावे वगळून एनआरसी लागू करण्याचा कट आहे," असे बॅनर्जी म्हणाल्या. केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि अमित शाह यांनी गुरुवारी लोकसभेत महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करण्यासाठी आणि परिसीमन आयोग स्थापन करण्यासाठी तीन विधेयके मांडण्याचा प्रस्ताव मांडला. विरोधी पक्षांनी या प्रस्तावित कायद्यांना घटनाबाह्य ठरवत विरोध दर्शवला आहे. 'संविधान (एकशे एकतीसवी सुधारणा) विधेयक, २०२६', 'सीमांकन विधेयक, २०२६' आणि 'केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा विधेयक), २०२६' सभागृहात सादर करण्यात आले. पश्चिम बंगाल विधानसभेच्या २९४ सदस्यांच्या निवडणुका २३ आणि २९ एप्रिल रोजी अशा दोन टप्प्यांत होणार आहेत. ४ मे रोजी मतमोजणी होईल.

### 'सीमांकनाचा अजेंडा' अयशस्वी ठरेल

**नवी दिल्ली** : तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा नेते डेरेक ओ'ब्रायन यांनी गुरुवारी महिला आरक्षण विधेयकांवरून सरकारवर नव्याने हल्ला चढवला. त्यांनी या विधेयकांना भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएचा 'दुष्ट कट' म्हटले असून, सरकारचा 'परिसीमन कार्यक्रम' अयशस्वी होईल, असेही ते म्हणाले. गुरुवारी मतविभागणीनंतर महिला आरक्षण कायद्यात फेरफार करण्यासाठीचे संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक लोकसभेत चर्चेला आले असता ही टिप्पणी करण्यात आली.

## शरियत कायद्यावरील तरतुदींना आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट, १९३७ मधील काही तरतुदी महिलांविरोधात भेदभाव करणाऱ्या असल्याचा मुद्दा उपस्थित करत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागवले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठात न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि विपुल एम. पांचोली यांचा समावेश होता. या खंडपीठाने याचिकेवरील प्राथमिक युक्तिवाद ऐकून केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाला नोटीस बजावली. ही याचिका पौलोमी पाविनी शुक्ला आणि न्याय नारी फाउंडेशन यांच्या वतीने दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी बाजू मांडली.

याचिकेत असा दावा करण्यात आला आहे की, शरियत कायद्यातील वारसा हक्कासंदर्भातील नियम महिलांना पुरुषांच्या तुलनेत कमी हिस्सा देतात, जे स्पष्टपणे भेदभावपूर्ण आहेत. अनेक प्रकरणांमध्ये महिलांना पुरुषांच्या तुलनेत अर्धा किंवा त्याहून कमी वाटा मिळतो, असा मुद्दा याचिकेत मांडण्यात आला आहे.

प्रशांत भूषण यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, १९३७ चा हा कायदा भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४चे उल्लंघन करतो, असे नमूद केले.

न्यायालयाने केंद्र सरकारकडून या प्रकरणी भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

### परिसीमनावर अखिलेश यादव यांचा भाजपला इशारा

## 'अयोध्येसारखाच पराभव उत्तर प्रदेशातही होईल'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्द्यावरून समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल करत, "जर या प्रक्रियेत काही राजकीय कट असेल, तर जशी अयोध्येत पराभव पत्करावा लागला, तसाच उत्तर प्रदेशातही भाजपला पराभवाला सामोरे जावे लागेल," असा इशारा दिला. महिला आरक्षण आणि परिसीमन विधेयकांवरील चर्चेदरम्यान त्यांनी सरकारच्या हेतूंवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

लोकसभेत बोलताना यादव यांनी स्पष्ट केले की, समाजवादी पक्ष महिला आरक्षणाच्या समर्थनात आहे, मात्र सरकारची कार्यपद्धती संशयास्पद आहे. "महिलांचे सशक्तीकरण करण्याऐवजी त्यांना राजकीय घोषणेत रूपांतर करण्याचा प्रयत्न सुरू आहे," असा आरोप त्यांनी केला. परिसीमन विधेयकावर टीका करताना त्यांनी म्हटले की, मतदारसंघांची फेररचना ही निष्पक्ष न राहता सत्ताधाऱ्यांना राजकीय फायदा होईल अशा पद्धतीने केली जाऊ शकते. "निवडणुकीचा नकाशा बदलण्याची ही रणनीती आहे," असा आरोप त्यांनी केला. जनगणनेच्या मुद्द्यावर भर देत यादव म्हणाले की, अद्ययावत आणि अचूक आकडेवारीशिवाय आरक्षणाची अंमलबजावणी करणे योग्य ठरणार नाही. "आधी जनगणना आणि जातजनगणना व्हावी, त्यानंतरच आरक्षण आणि परिसीमन प्रक्रिया राबवावी," अशी मागणी त्यांनी केली. तसेच, मागासवर्गीय आणि मुस्लिम महिलांचा आरक्षणात समावेश करण्याची मागणी करत त्यांनी "अर्ध्या लोकसंख्येत सर्व घटकांचा न्याय्य सहभाग असला पाहिजे," असे नमूद केले.

राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचा दाखला देत त्यांनी सांगितले की, समाजवादी विचारधारा महिलांना समान हक्क देण्याची आहे. मात्र, "सरकार घाईघाईत निर्णय घेत आहे का?" असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर शंका व्यक्त केली. महिला आरक्षणातील रोटेशन पद्धतीवरही त्यांनी आक्षेप घेतला. "योग्य डेटा नसताना रोटेशन केल्यास अन्याय होऊ शकतो," असे ते म्हणाले.